## दिवाणी दावा क्र. ४६६/२०१५ मधील नि.क्र.५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादी क्र.१ व २ विरूध्द प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत दावा मिळकत पैकी गट क्र.५५८/१ड क्षेत्र १ हे ५९ आर मौजे खरडगाव ता शेवगाव या शेतजमीनीबाबत तुर्तातुर्त ताकीद मागण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता हुकुम ३९, नियम १, २ नुसार दाखल केला आहे. यापुढे सोईसाठी सदर मिळकतीस दावा मिळकत असे संबोधण्यात येईल.

२. वादीचे अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे -

दावा मिळकत ही वादीची मालकी हक्क वहीवाटीची आहे. सदर मिळकतीमधून शेवगाव ते आखेगाव रोड गेलेला आहे. दावा मिळकत वादीस वारसाने त्याचे नावाने आलेली आहे. वादीचा मालकी व ताबा दावा मिळकतीत आहे.

३. पुढे वादीचे असे कथन की, प्रवादी यांचा दावा मिळकतीशी काहीही हितसंबंध नाही. वादी हे शेवगाव येथे राहून दावा मिळकतीत येवून जावून शेती करतात. या गोष्टीचा गैरफायदा घेवून दाव्यातील सर्व प्रवादी यांनी वादीच्या दावा मिळकतीत वादीच्या वस्तीचे पश्चिमेस पाया खोदून बेकायदेशीर बांधकाम करण्याचे विचारात आहे. वादीने प्रवादींना समजावून सांगितले,परंतू प्रवादींनी ऐकले नाही. त्यानंतर प्रवादीने वादींना असा दम दिला की, आम्ही दावा मिळकतीत पाया खोदून घर बांधणार तुम्हाला काय करावयाचे ते करा. वादीने दि.२२/१२/२०१५ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात प्रवादी विरुध्द वरील बाबीची अदखलपात्र गुन्हा दाखल केला.

४. पुढे वादीचे असे कथन की, दि.२१/१२/०१५ रोजी प्रवादी क्र.१ ते ९ यांनी बेकायदेशीररित्या दावा मिळकतीत अनाधिकाराने पाया खोदून रात्रीतून गट भरुन आणला आहे. वादीला दुस-या रोजी सकाळी वरील बाब समजली. त्यामुळे वादीने अशी विनंती केली की, दावा मिळकतीत वादीच्या वहीवाटीस प्रवादी क्र.१ व २ यांनी हरकत अडथळा करु नये व अनाधिकाराने पाया खोदून बांधकाम करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम देण्यात यावा.

५. प्रवादी क्र.१ यांनी दाव्याची व मनाई अर्जाची कैफियत नि.क्र.१७ वर दाखल केली. प्रवादी क्र.२ याने प्रवादी क्र.१ ची कैफियत नि.क्र.१७ मान्य असल्याबाबतची पुरसिस नि.क्र.१९ दि. ०४/०४/२०१६ रोजी संचिकेत दाखल केल्याचे दिसून येते.

६. प्रवादी क्र.१ व २ चे थोडक्यात कथन असे की, वादीने दाव्यात आवश्यक इसमांना पक्षकार म्हणून सामील केलेले नाही. तसेच वादीने दावा मिळकतीवर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिलेले नाही. तसेच वादीचा दावा मुदतीत नाही. तसेच दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे दिलेले आहे. तसेच वादीची मालकी व वहीवाट ही प्रवादीने नाकारली आहे. तसेच वादीने प्रवादी विरुध्द अदखलपात्र गुन्हा खोटा दाखल केला. तसेच प्रवादींनी वादीची कथने ही नाकारली आहेत.

७. प्रवादींचे पुढे असे कथन की, दावा मिळकत गट क्र.५५८ चा मूळ पूर्वीचा सर्वे नं. १९५ होता. गट क्र.१९५/१ चे क्षेत्र ११हे ६४ आर, सर्वे नं १९५/२ चे क्षेत्र ० हे ३९ आर, १९५/२ क्षेत्र ० हे ३९ आर ही जमीन पीर देवस्थानला दिलेली होती. तसेच उर्वरीत सर्वे नं १९५/१ क्षेत्र १/२ हिश्याने प्रवादीचे वंशज काशीनाथ यशवंत लाड व त्यांचे भाउ यांना एकत्र कुटुंबाकरीता मिळालेली होती व ते वहीवाट करीत होते. पुढे प्रवादीचे वंशज काशीनाथ हा आडाणी व भोळसर असल्याने गट एकत्रीकरण योजनेमध्ये कुंडलिक धोंडीबा बोडखे याने गट एकत्रीकरण अधिका-याशी संगनमत करुन फेर क्र. १२०५ अन्वये एकटयाचे नाव संपूर्ण सर्वे क्र.१९५/१ व १९५/२ चा गट क्र.५५८ च्या क्षेत्रास बनावट स्वरुपाचे नोंदवून घेतले. तसेच त्यानंतर सदर जमीनीचे क्षेत्र प्रवादीस मिळू नये म्हणून सदर क्षेत्राची विभागणी महसूल अधिका-यांना हाताशी धरुन वादीच्या नावासहीत इतर कुटुंबातील सदस्यांचे नावावर मालकी हक्क नसतांनाही ७/१२ रेकॉर्डला नोंद करुन घेतली.

८. प्रवादीचे पुढे असे कथन की, कुंडलिक धोंडीबा बोडखे यांना काशीनाथ यशवंता यांच्या अर्ध्या हिश्यामध्ये कोणताही हक्क हितसंबंध नव्हता, तरीही स्वतहाचे नाव दावा मिळकतीस लावून घेतले होते. म्हणून प्रवादींनी जिल्हा अधिक्षक,भूमी अभिलेख,अहमदनगर यांचेकडे अपील क्र. ५४८/२०१३ चे अपील दावा मिळकतीस चुकीची नोंद झालेले कुंडलिक बोडखे यांचे नाव सर्वे नं १९५/१ च्या ७/१२ वरुन रदद करण्यासाठी दाखल केले होते. सदर अपीलाचे कामकाज गुणदोषावर होवून प्रवादी यांचे अपील मान्य करण्यात येवून मौजे खरडगाव ता शेवगाव येथील दावा मिळकत सर्वे क्र १९५/१ (गट क्र ५५८) बाबतच्या हिस्सा फॉर्म नं १२ फेर क्र.१२०५ मंजूर दि.१५/०३/१९७५ हा सर्वे क्र.१९५/१ पुरता रदद करण्यात येत आहे असा आदेश झालेला आहे. तसेच सर्वे क्र.१९५/१ यास जुन्या ७/१२ प्रमाणे काशीनाथ यशवंता लाड व त्या अनुषंगाने त्यांचे वारसाची नावे दाखल करुन एकत्रिकरण कायदा कलम ३१(अ) अन्वये शुध्दीपत्रक नियमानुसार तयार करुन विहीत मार्ग मंजुरीसाठी सादर करण्याचा आदेश झालेला आहे.

९. प्रवादीचे पुढे असे कथन की, दावा मिळकतीचा मूळचा सर्वे नं १९५/१ चा गट क्र.५५८

झालेला असून १९५/१च्या उत्तरेकडील १/२ क्षेत्रास प्रवादीचे वडीलांची व पूर्वजांची कबजे वहीवाट होती. प्रवादीचे चुलते काशीनाथ यशवंता यांना एकत्र कुटुंब कर्ता म्हणून दि.०७/११/१९४८ रोजी महा. सरकारकडून वरील जमीन मिळालेली आहे. काशीनाथ यशवंता यांचे नावाची नोंद २५/०२/१९४९ रोजी नोंदवून सर्वे नं १९५ च्या ७/१२ उता-यास फेर नोंद क्र.१८९ अन्वये दि.२७/०७/१९५७ रोजी मंजूर झाली आहे. तेव्हा पासून सदर दावा मिळकतीचे क्षेत्रामध्ये काशीनाथ यशवंता लाड यांनी व त्यांचे कुटुंबाची व त्यांचेनंतर वारसांची म्हणजे प्रवादींची कबजे वहीवाट आहे. प्रवादीने वादीचा मालकी व ताबा दावा मिळकतीत नाकारला आहे. प्रवादीने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

१०. वादी व प्रवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा प्रस्तुतचे अर्जावर युक्तीवाद ऐकला.

११. दाव्यातील पक्षकथनांचा व अभिलेखावरील कागदपत्रांचा विचार करता, पुढील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादी यांची सकृतदर्शनी केस आहे काय? | नकारार्थी |
| ०२. | न्यायाचा तराजु वादींचे बाजुने झुकतो काय? | नकारार्थी |
| ०३. | तुर्तातुर्त मनाई आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी |
| ०४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

१२. वादींतर्फे पुढील दस्तऐवज दाखल करण्यात आले-

वादी यांनी गट क्र. ५५८/१/ड चा महसूल ७/१२ उतारा नि. क्र. ८ वर दाखल केला. तसेच गट क्र.५५८/३ चा महसूल ७/१२ नि. क्र ९ वर दाखल केला. तसेच गावनमुना ८अ चा खातेउतारा नि.क्र.१० वर दाखल केला. तसेच आर.सी.एस. नं १३८/१९९३ मधील हुकूमनामा सत्यप्रतीत यादी नि.क्र.३ सह दाखल केला. तसेच अदखलपात्र गुन्हा नोंद क. १०५०/२०१५ दि. २२/१२/२०१५ रोजीची वादी यांनी प्रवादी विरुध्द दिलेल्या तक्रारीची कार्बनप्रत यादी नि.क्र.३ सह दाखल आहे. तसेच दावा मिळकतीत पाया खोदण्यात आल्याबाबतचा फोटो यादी नि.क्र.३ सह दाखल करण्यात आला आहे. तसेच वादी यांनी यादी नि.क्र.२२ सह मा.उपसंचालक, भूमी अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांच्या न्यायालयासमोरील अपीलाचा क्रमांक २५०/२०१५ मधील न्यायनिर्णयाची छायांकित प्रत दाखल केली.

१३. प्रवादींतर्फे पुढील दस्तऐवज दाखल करण्यात आले-
प्रवादी यांनी यादी नि.क्र २४ सह सर्वे नं.१९५ चा महसूल ७/१२ उतार सन १९६२ ते १९७५ मधील नोंदी असलेला छायांकित प्रतीत दाखल केला. तसेच फेर क्र.१८९ हक्काचे पत्रक छायांकित प्रतीत दाखल केले. तसेच सर्वे नं १९५ चा महसूल ७/१२ उतार सन १९६३ ते १९७१ मधील नोंदी असलेला छायांकित प्रतीत दाखल केले. तसेच उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचे क्षेत्र समज नोटीस सत्यप्रतीत दाखल केली. तसेच जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, अहमदनगर येथील आदेश छायांकित प्रतीत दाखल आहे. तसेच प्रवादीने वादीविरुध्द अदखलपात्र गुन्हा नोंद क्र. १०५४/२०१५ दि.२५/१२/२०१५ रोजी दाखल केल्याची तक्रार छायांकित प्रतीत दाखल केली.

**-: का र ण मि मां सा :-**
(मुददा क्र १ ते ३ वर निष्कर्ष)

१४. सदरील वरील सर्व मुददे एकमेकाशी संलग्न असल्याने त्यांचे निष्कर्ष मी एकत्रित नोंदविण्याचे ठरविले. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले की, दावा मिळकत गट क्र.५५८/१/ड क्षेत्र १ हे ५९ आर वर त्याचा मालकी हक्क व ताबा आहे. सदर संपूर्ण मिळकत ही त्यास वारस हक्काने मिळालेली आहे. वादी याने दावा मिळकतीचे महसूल ७/१२ उतारा नि.क्र.८ वर दाखल केला आहे. सदर दस्त नि.क्र.८ मध्ये संबंधीत नोंदी या सन २००९-२०१० या कालावधीमधील आहेत. दावा मिळकतीवर वादीचा ताबा दाव्यास कारण घडले दि.२१/१२/२०१५ रोजी असत्याबाबतची नोंद दस्त नि.क्र.८ मध्ये नमूद नाही. दस्त नि.क्र. ८ हा अदयावत नाही. वादी यांनी उचित संधी असतांनाही दावा मिळकतीचे ताब्याविषयी अदयावत दस्ताऐवज आजतागायत दाखल केले नाहीत. त्यामुळे वादीचा ताबा दावा मिळकतीत दाव्यास कारण घडले दि. २१/१२/२०१५ रोजी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

१५. प्रवादी यांनी त्यांचे लेखी कैफियतमध्ये असे नमूद केले की, वादीचा मालकी हक्क व वहीवाट दावा मिळकतीवर नाही. तसेच वादी हा मनाई हुकूमाचे आधारे प्रवादीचा दावा मिळकतीचे उपभोगास हरकत अडथळा करीत आहे. दावा मिळकतीत प्रवादी यांचाच ताबा आहे. दावा मिळकतीत प्रवादी यांचा ताबा असल्याबाबतचे ठोस महसूल दस्तऐवज प्रवादी यांनी सदर संचिकेत दाखल केले नाहीत. त्यामुळे प्रवादी यांची दावा मिळकतीचे ताब्याबाबतची कथने प्रथमदर्शनी शाबीत होत नाही.

१६. प्रवादी यांचे लेखी कैफियतमध्ये असे कथन की, वादी यांचेकडे दावा मिळकतीची महसूल अधिका-यांना हाताशी धरुन दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यास पोकळीस्त त्याचे नावाची नोंद करुन घेतलेली आहे. सदरची नोंद फेर नोंद क्र. १२०५ ने झाली होती. सदरील नोंद जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांनी रददबातल ठरवली आहे. प्रवादी यांनी यादी नि.क्र.२४ सह जिल्हा अधिक्षक भूमी

अभिलेख अहमदनगर येथील अपील क्र. ५५८/२०१३ दि.२७/०२/२०१५ रोजीचा न्यायनिर्णय छायांकित प्रतीत दाखल केला. सदर न्यायनिर्णयाचे मी अवलोकन करतो. सदर न्यायनिर्णयानुसार असे दिसून येते की, प्रवादी यांनी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख अहमदनगर यांचेकडे अपील केले की, दावा मिळकतीस चुकीचे नोंद झालेले कुंडलिक बोडखे यांचे नाव सर्वे नं. १९५/१च्या ७/१२ वरुन रदद करण्यासाठी दाखल केले होते. सदर अपीलाचे कामकाज गुणदोषावर होवून प्रवादी यांचे अपील मान्य करण्यात येवून मौजे खरडगाव ता शेवगाव येथील दावा मिळकत सर्वे क्र.१९५/१ चा फेरफार क्र. १२०५ मंजूर दि.२५/०३/१९७१ हा सर्वे नं.१९५/१ पुरता रदद करण्यात येत आहे व इतर आदेशपारीत करण्यात आल्याचे दिसून येते. सदर आदेशावरुन असे दिसून येते की, वादीचे पूर्वज कुंडलिक धोंडीबा बोडखे यांचे नाव सर्वे नं. १९५/१ ला फेरफार क. १२०५ अन्वये जे लागले होते ते जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांनी सदर फेरफार क्र.१२०५ दि.२५/०३/१९७१ चा सर्वे नं. १९५/१ बाबत पुरता दि. २७/०२/२०१५ रोजी रदद केला आहे. त्यामुळे वादी व वादीचे पूर्वजांची नोंद दावा मिळकतीत जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचे आदेशावरुन आज रोजी दावा मिळकतीत नाही असे दिसून येते. तसेच फेरफार नोंद क्र १२०५ मध्ये असलेल्या नोंदी या पोकळीस्त असल्याचा निष्कर्ष निघतो. त्यामळे वादीचा कायदेशीर ताबा दावा मिळकतीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

१७. वादी यांनी जिल्हा अधिक्षक,भूमी अभिलेख,अहमदनगर येथील अपील क्र. ५४८/२०१३ मधील दि.२७/०२/२०१५ रोजीच्या निकालास उप संचालक,भूमी अभिलेख,नाशिक येथे आव्हान दिले आहे. उप संचालक,भूमी अभिलेख,नाशिक यांनी अपील एस.आर.३४३/२०१४ हे दाखल केले. त्याचा निकाल दि. ३०/०३/२०१५ रोजी लागला आहे. सदर निकाल हे अपील दाखल करण्याचे स्तरावरच विलंब माफीच्या बाबीवरच फेटाळण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख अहमदनगर येथील अपील क्र. ५४८/२०१३ दि.२७/०२/२०१५ रोजीचा निकाल अदयाप कायम असल्याचे दिसून येते. त्या निकालानुसार फेरफार क्र.१२०५ हा सर्वे नं.१९५/१ (गट क्र.५५८ ) पुरता रदद झालेला निकाल आतजागायत कायम आहे. त्यामुळे आज रोजी वादीचा ताबा दावा मिळकतीत असल्योच प्रथम दर्शनी दिसून येत नाही.

१८. प्रवादी यांनी यादी नि.क्र.२४ सह जिल्हा अधिक्षक,भूमी अभिलेख येथील प्रकरण अपील क्र.५४८/२०१३ दि.२७/२/२०१५ व उप संचालक भूमी अभिलेख, नाशिक अपील एस.आर. ३४३/२०१४ निकाल तारीख ३०/०३/२०१५ बाबत दस्त दाखल केले आहेत. सदर बाबीवर वादी यांनी त्याचे वादपत्रात व मनाई हुकूमाचे अर्जात कुठेही उहापोह हा केलेला नाही. त्यामुळे वादी न्यायालयासमोर दावा मिळकतीबाबत महत्वाच्या बाबी लपवून ठेवल्याबाबतचा निष्कर्ष निघतो. तसेच

वादी हा न्यायालयासमोर स्वच्छ हाताने न आल्याचा निष्कर्ष निघतो.

१९. वादी यांनी वादपत्रात तसेच मनाई हुकूमाच्या अर्जात दावा मिळकतीच्या चतुर्सिमा या नमूद केल्या नाहीत. त्यामुळे दावा मिळकतीची हदद व खुणा एकंदरीत वस्तूस्थिती न्यायालयासमोर स्पष्ट होत नाही.

२०. वादीने वादपत्रात व मनाई हुकूमाचे अर्जात असे नमूद केले की, दावा मिळकत ही त्यास मालकी हक्क व वहीवाटीने व वारसाने आलेली आहे. परंतू वादी यांनी दावा मिळकतीच्या मालकीबाबत दस्तऐवज या न्यायालयापुढे दाखल केले नाहीत. तसेच महसूल दस्तऐवजामधील नोंदी या मालकी हक्काच्या होत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी वादीची केस शाबीत होत नाही.

२१. वादीने अदखलपात्र गुन्हा क्र.१०५०/२०१५ हा गुन्हा दि.२२/१२/२०१५ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात प्रवादी विरुध्द दाखल केला आहे. परंतू, सदर अदखलपात्र गुन्हयाच्या दस्तामध्ये दावा मिळकतीचे ठिकाण अगर गट क्रमांक हे नमूद नाहीत. त्यामुळे सदर दस्तावरुन वादीचा ताबा शाबीत होत नाही.

२२. वादीने यादी नि.क्र.३ सह फोटो दाखल केले आहेत, परंतू सदर फोटो हे दावा मिळकतीचे आहेत याबाबत या टप्प्यावर कोणतेही अनुमान काढता येणार नाही. वादी यांनी यादी नि.क्र.३ सह आर सी.एस.क्र.१३८/१९९३, १९२/२००१ या दाव्यातील हुकूमनामे सत्यप्रतीत दाखल केले. परंतू सदर हुकूमनाम्यांचा उहापोह वादी यांनी त्यांचे वादपत्रात व अंतरिम मनाई हुकूमाचे अर्जात केला नाही. त्यामुळे या टप्प्यावर सदर हुकूमनाम्यांचा आधार वादी यांना घेता येणार नाही.

२३. एकंदरीत जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख अहमदनगर अपील क्र.५४८/२०१३ येथील निकाल दि.२७/०२/२०१५ नुसार प्रवादी यांचे अपील मान्य करण्यात आले आहे. तसेच फेरफार क्र. १२०५ हा सर्वे नं.१९५/१ पुरता रदद करण्यात आलेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीच्या महसूल दप्तरी वरील निर्णया आधारे वादी व वादीच्या वारसांची नोंद ही रददबातल झाल्याचे दिसून येते. तसेच दाव्यास कारण घडले त्यारोजी दावा मिळकतीत वादीचा ताबा असल्याबाबतचा ठोस पुरावा या न्यायालयापुढे दाखल नाही. तसेच महसूल कार्यालयासमोरील बाबीचा वादीने वादपत्रात उहापोह न केल्याने वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयासमोर न आल्याचे दिसून येते. तसेच वादी हा दावा मिळकतीबाबत महत्वाच्या बाबी व आजची वस्तूस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवल्याबाबतचा

निष्कर्ष निघतो. वादपत्रात दावा मिळकतीच्या चतुर्सिमा नमूद नाहीत. त्यामुळे वादीने प्रथमदर्शनी त्यांची केस शाबीत केली नाही. त्यामुळे वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता या न्यायालयास दिसून येत नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल तराजू वादेच्या बाजूने झुकत नाही. म्हणून मी मुददा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**-: आ दे श :-**

१) प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२) या अर्जाचा खर्च मूळ दाव्याच्या खर्चाच्या कामी समाविष्ट करण्यात येत आहे.

दिनांक : २३/११/२०१६

ठिकाण : शेवगाव

(आ. सु. आलेवार)
२रे सह दिवाणी न्यायाधिश (क) स्तर
शेवगाव.